**विषय:- अंतर्गत गुण याद्या ई-सुविधा केंद्राच्या पोर्टलमार्फत ऑनलाईन जमा करणेबाबत.**
**संदर्भ:- परीक्षा/प.मू.व.मं./समन्वय/२०२०/९५५ दिनांक १०-०५-२०२०.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय परिपत्रकान्वये आपणांस कळविण्यात येते की, मार्च-एप्रिल २०२० मधील पदवी परीक्षांच्या सर्व विषयांच्या प्राप्त्याक्षिक परीक्षा दिनांक २ मार्च २०२० ते १४ मार्च २०२० दरम्यान घेण्यात आल्या होत्या. सदरील प्रात्याक्षिक परीक्षांचे गुण ज्या महाविद्यालयांनी ई-सुविधा केंद्राच्या पोर्टलमार्फत ऑनलाईन जमा केले नसतील त्यांनी दिनांक १६ मे २०२० पूर्वी जमा करावेत.

तसेच पदव्युत्तर परीक्षांसंबंधी सर्व विभाग प्रमुख व प्राचार्य यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय परिपत्रकामध्ये दिलेल्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करुन पदव्युत्तर परीक्षांचे प्रात्याक्षिक गुण दिनांक १६ मे २०२० पर्यंत ई-सुविधा केंद्राच्या ऑनलाईन पोर्टलमार्फत परीक्षा व मूल्यमापन विभागास सादर करावे.

तसेच अभियांत्रिकी व औषध निमार्णशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे सुद्धा प्रात्यक्षिक गुण ई-सुविधा मार्फत संबंधित महाविद्यालयाने सादर करावे, ही विनंती.

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## परीक्षा व मूल्यमापन विभाग

### परिपत्रक/परीक्षा व मूल्यमापन मंडळ/समन्वय/२०२०/कोव्हीड

**तातडीचे परिपत्रक**

प्रस्तुत विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल, २०२० मधील सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे अंतर्गत गुण ई-सुविधा केंद्राच्या पोर्टलमार्फत ऑनलाईन भरण्यासाठी या कार्यालयाचे परिपत्रक संदर्भ क्र. परीक्षा/प.मू.मं./समन्वय/२०२०/२५७, दि. १०-०५-२०२० अन्वये दि. १६-०५-२०२० पर्यंत मुदत देण्यात आली होती. मा. कुलगुरुंच्या परवानगीने आता या परिपत्रकाद्वारे अंतर्गत गुण ई-सुविधा केंद्राच्या पोर्टलमार्फत ऑनलाईन भरण्यासाठी दि. २७-०५-२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

तरी, सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी ही विनंती.

डॉ. गणेश मंझा
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

विद्यापीठ प्रांगण, )(
औरंगाबाद )(
**संदर्भ :** पवमूमं/समन्वय/२०२०/कोव्हीड )(
**दिनांक:** १५-०५-२०२० )(

Scanned with CamScanner

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## परीक्षा व मूल्यमापन विभाग

## परिपत्रक/परीक्षा व मूल्यमापन मंडळ/समन्वय/२०२०/कोव्हीड

### मुदतवाढ परिपत्रक

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये कळविण्यात येते की, दि. १७-०५-२०२० रोजीच्या परिपत्रकानुसार मार्च/एप्रिल, २०२० मधील नियोजित परीक्षेसाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र शासन यांनी ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांन्वये विद्यापीठाने परीक्षेसंबंधी जाहीर केलेल्या धोरणानुसार एक खास बाब म्हणून पात्र परीक्षार्थींना, विद्यापीठ मुख्य परिसरातील शैक्षणिक विभाग व उपपरिसरातील सर्व शैक्षणिक विभागांतील परीक्षार्थींना तसेच सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्थांतील व्यावसायीक अभ्यासक्रमांच्या परीक्षार्थींना ऑनलाईन पद्धतीने परीक्षा आवेदनपत्र भरण्यासाठी अंतिम दि. २७-०५-२०२० हा देण्यात आला होता. परंतु काही तांत्रिक कारणामुळे ऑनलाईन पद्धतीने परीक्षा आवेदनपत्र भरण्यासाठीची लिंक सुरू करणे शक्य झाले नाही त्यामुळे मार्च/एप्रिल, २०२० च्या परीक्षेसाठी सर्व पात्र परीक्षार्थींचे परीक्षा आवेदनपत्र भरण्यासाठी दि. ०५-०६-२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

**ऑनलाईन पद्धतीने परीक्षा आवेदनपत्र स्विकारतांना विद्यापीठामार्फत परीक्षार्थींकडून शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी प्रसिद्ध केलेल्या निर्धारित वेळापत्रकात दर्शविल्याप्रमाणे फक्त नियमित शुल्क आकारले जात आहे.** कुठल्याहीप्रकारचे विलंब किंवा अतिविलंब शुल्क आकरले जाणार नाही ही बाब विद्यापीठ व उपपरिसर सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख तसेच सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थांचे संचालक यांनी परीक्षार्थींच्या निदर्शनास आणून द्यावी.

तसेच मार्च-एप्रिल, २०२० मधील सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे अंतर्गत गुण ई-सुविधा केंद्राच्या पोर्टलमार्फत ऑनलाईन भरण्यासाठी या कार्यालयाचे परिपत्रक संदर्भ क्र. परीक्षा/ प.मू.मं./समन्वय/२०२०/२५७, दि. १०-०५-२०२० अन्वये दि. १६-०५-२०२० पर्यंत मुदत देण्यात आली होती. आणि दि. १५-०५-२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये अंतर्गत गुण भरण्यासाठी दि. २७-०५-२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. आता या परिपत्रकाद्वारे अंतर्गत गुण ई-सुविधा केंद्र पार्टलमार्फत भरण्यासाठीही दि. ०५-०६-२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. याची सर्वसंबंधितांनी नोंद घ्यावी.

डॉ. गणेश मंझा
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

विद्यापीठ प्रांगण, )(
औरंगाबाद )(
**संदर्भ :** पवमूमं/समन्वय/२०२०/कोव्हीड )(
**दिनांकः** २७-०५-२०२० )(

Scanned with CamScanner

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## परीक्षा व मूल्यमापन विभाग

## परिपत्रक/परीक्षा व मूल्यमापन मंडळ/समन्वय/२०२०/कोव्हीड

### परिपत्रक

या परिपत्रकाद्वारे प्रस्तुत विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख, उपपरिसर उस्मानाबाद येथील सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख, प्राचार्य, मॉडेल कॉलेज, घनसावंगी, जि. जालना आणि विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थांचे संचालक यांना मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठाने पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षार्थीचे परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क स्विकारून त्यांच्या परीक्षांचे नियोजनदेखील केलेले होते. परंतु कोरोना या जागतिक महामारीच्या विषाणुच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारकडून अचानक संपूर्ण देशात टाळेबंदी लागू केल्याने विद्यापीठाच्या परीक्षेच्या नियोजनानुसार पदवी अभ्यासक्रमांच्या फक्त प्रात्यक्षिक परीक्षा पूर्ण होऊ शकल्या. मात्र, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रात्यक्षिक व लेखी परीक्षा आणि पदवी अभ्यासक्रमांच्या लेखी परीक्षा स्थगीत् कराव्या लागल्या.

त्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र शासन यांनी ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांन्वये विद्यापीठाने परीक्षेसंबंधीचे धोरण जाहीर केलेले आहे. या धोरणान्वये एक खास बाब म्हणून पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी पात्र परीक्षार्थीना परीक्षा आवेदनपत्र भरावयचे असल्यास त्यांनी विहीत शुल्कासह विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील उपलब्ध आवेदनपत्र ऑनलाईन पद्धतीने भरावे लागेल. परीक्षार्थीने विहीत शुल्कासह भरलेले परीक्षा आवेदनपत्र थेट महाविद्यालय/परिसंस्थेच्या लॉगीनमध्ये जाईल. त्यानंतर संबंधीत महाविद्यालय/परिसंस्थांनी त्यांच्या पात्र परीक्षार्थीचे आवेदनपत्रातील परीक्षार्थी घेत असलेले शिक्षण, त्याने निवडलेले विषय, ऑनलाईन पद्धतीने भरलेल शुल्क इत्यादी बाबी काटेकोरपणे तपासून बरोबर असल्याची खात्री करूनच आवेदनपत्र ऑनलाईन पद्धतीने विद्यापीठाकडे सादर करण्यासाठी अंतिम दि. २७-०५-२०२० हा राहील.

नव्याने प्रवेश घेतलेले व यापूर्वी प्रात्यक्षिक परीक्षा न झालेले परीक्षार्थी असतील तर त्यांना कळविण्यात येते की, कोणत्याही अभ्यासक्रमांच्या कोणत्याही प्रात्यक्षिक परीक्षा होणार नाहीत फक्त त्यांना लेखी परीक्षेच्या गुणांच्या सरसरीनुसार गुण मिळणार आहेत.

विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभाग व उपपरिसर, उस्मानाबाद येथील सर्व शैक्षणिक विभाग यांच्या सर्व परीक्षार्थीचे आवेदनपत्र व परीक्षा शुल्क भरावयाचे बाकी असल्याने त्यांनीसुद्धा संलग्नित महाविद्यालये/परिसंस्थांच्या परीक्षार्थीप्रमाणे उपरोक्त नमूद पद्धतीने परीक्षा आवेदनपत्र सादर करण्याची प्रक्रिया दि. २७-०५-२०२० पूर्वी पूर्ण करण्याबाबत विभाग प्रमुखांनी सर्व संबंधीतांना सूचित करावे.

विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्थांच्या व्यावसायीक अभ्यासक्रमांच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ मध्ये संपन्न झालेल्या परीक्षांपैकी काही अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल उशीराने घोषीत झाले असल्याने त्या सर्व महाविद्यालये/परिसंस्थांनी काळजीपूर्वक आपल्या पात्र परीक्षार्थीना उपरोक्तप्रमाणे नमूद दि. २७-०-५-२०२० पूर्वी परीक्षा आवेदनपत्र सादर करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत परीक्षार्थी व सर्व संबंधितांना तात्काळ सूचित करावे.

तरी, सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी ही विनंती.

डॉ. गणेश मंझा
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

विद्यापीठ प्रांगण, )(
औरंगाबाद )(
**संदर्भ :** प्रवमूमं/समन्वय/२०२०/कोव्हीड )(
**दिनांक:** १७-०५-२०२० )(

Scanned with CamScanner

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
## परीक्षा व मूल्यमापन विभाग

**परिपत्रक/परीक्षा व मूल्यमापन मंडळ/समन्वय/२०२०/कोव्हीड**

**परिपत्रक**

या परिपत्रकाद्वारे प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थांचे संचालक यांना सूचित करण्यात येते की, मा. कुलगुरूसमवेत व्हिडिओ कॉन्फरंसिंगद्वारे झालेल्या बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासन यांनी ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचना व प्राप्त निर्देशांनुसार विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षार्थींच्या परीक्षा माहे जुलै, २०२० मध्ये आयोजित करावयाच्या आहेत. त्या परीक्षा घेतांना कोरोना या जागतिक महामारीच्या विषाणुच्या पार्श्वभूमीवर आपल्याला एक व्यक्ती दुसऱ्यापासून केंद्र सरकारने ठरवून दिलेल्या मानकानुसार ठरावीक शारिरीक अंतर ठेवणे आवश्यक आहे. ज्यामुळे कोरोणा या विषाणुचा प्रसारही होणार नाही व परीक्षाही व्यवस्थितरित्या संपन्न होण्यास मदत होईल.

म्हणून सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्ष परीक्षेच्या आयोजनासाठी परीक्षा केंद्र निश्चित करतांना महाविद्यालये/परिसंस्थांकडे उपलब्ध असलेल्या भौतिक सुविधांबद्दलची माहिती असणे आवश्यक आहे. त्यासाठी महाविद्यालये/परिसंस्थांनी खालील कोष्टकात त्यांच्या महाविद्यालय/परिसंस्थेकडे उपलब्ध असलेल्या भौतिक सुविधांची माहिती भरून coe@bamu.ac.in आणि coordination.exam@bamu.ac.in या ई-मेल पत्त्यावर स्पष्टपणे वाचता येईल या स्वरूपात दि.. २५-०५-२०२० पूर्वी पाठवावी. माहिती शक्य असल्यास Microsoft Office Excel Worksheet मध्ये Times New Roman-8 च्या साईजमध्ये पाठविली तर तात्काळ नियोजनासाठी अत्यंत उपयुक्त व महत्त्वपूर्ण राहील.

| | | |
|---|---|---|
| **Name & Address of the College :** | | |
| **College Code:** | | |
| **Name of the Principal:** | | |
| **Sr. No.** | **Room No.** | **Number of Desk** |
| 1. | | |
| 2. | | |
| 3. | | |
| 4. | | |
| 5. | | |
| **Total** | | |

तरी, सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी ही विनंती.

डॉ. गणेश मंझा
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

विद्यापीठ प्रांगण, )(
औरंगाबाद )(
**संदर्भ :** पवमूमं/समन्वय/२०२०/कोव्हीड )(
**दिनांक:** १७-०५-२०२० )(

Scanned with CamScanner

अखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद्
(भारत सरकार का एक सांविधिक निकाय)
(मानव संसाधान विकास मंत्रालय, भारत सरकार)
नेल्सन मंडेला मार्ग, वसंत कुंज, नई दिल्ली-110070

ALL INDIA COUNCIL FOR TECHNICAL EDUCATION
(A Statutory Body of the Govt. of India)
(Ministry of Human Resource Development, Govt. of India)
Nelson Mandela Marg, Vasant Kunj, New Delhi-110070

सत्यमेव जयते

Phone : 011-26131577 - 78, 80
011-29581000
Website : www.aicte-india.org

**F.No.AICTE/P&AP/Misc/2021** **Date:24.08.2021**

# Circular

To,

**All Vice Chancellors of Technical Universities, Directors/Principals of AICTE Approved Institutions.**

**Subject: - Guidelines for conducting written examination for Persons with Benchmark Disabilities.**

Sir/Madam

The Ministry of Social Justice & Empowerment, Department of Empowerment of Persons with Disabilities (Divyangjan) has issued the guidelines for conducting written examination for persons with disabilities defined in terms of erstwhile Persons with Disabilities (Equal Opportunities, Protection for Rights and Full Participation) Act, 1995 vide OM No. 16-110/2003-DD III dated26.02.2013). The Central Government later on enacted the Rights of Persons with Disabilities Act, 2016 (RPwD Act, 2016) which came into force from 19.04.2017. The Act provides for reservation in Government jobs for persons with benchmark disabilities as defined under section 2 (r) of the said Act. Accordingly, Department of Empowerment of Persons with Disabilities vide O.M No. 34-02/2015-DD-III dated 29.08.2018 revised the guidelines issued in 2013.The word “extra time or additional time” that is being currently used has been changed to “Compensatory time” and the same should not be less than 20 minutes per hour of examination for persons who are allowed use of scribe/reader/lab assistant.

In view of above, you are requested to take necessary actions for strict implementation of the revised guidelines, corrigendum & order dated 4.12.2018 of Hon'ble High court, while conducting examination and also during conducting online examination for Persons with Benchmark disabilities in your institutions and persons with benchmark disabilities may be allowed additional time during the online examination as per the revised guidelines. Further details on revised guidelines may be accessed from the web portal of Ministry of Social Justice & Empowerment.

Regards,

**(Prof. Dileep N. Malkhede)**
**Advisor-I**
**(Policy & Academic Planning Bureau)**

Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Aurangabad-431004 Maharashtra (India)
NAAC Re-Accredited A

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे "अ" दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
Director : (0240) 2403201
Office : (0240) 2403178/199
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac.
E-Mail : coe@bamu.ac.in

Office of the Director
Board of Examinations & Evaluation
कार्यालय, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ क्र परीक्षा/२०२१/ 642

दिनांक : ०१.१२.२०२१

# परिपत्रक

**प्रस्तावना :**

मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये परीक्षा व मूल्यमापन विभागात विद्यार्थी, पालक, महाविद्यालयाचे अधिकारी/कर्मचारी /प्रतिनिधी यांच्या सुविधाकरिता एक खिडकी योजना काऊंटर स्थापन करण्यात आलेले असून सदरील एक खिडकी योजनेमार्फत निकालासंबंधीच्या त्रुटी, राखीव असलेले निकाल जाहीर करणे तसेच विविध प्रमाणपत्र व आवश्यक कागदपत्र मागणी अर्ज स्वीकारणेबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. सदरील एक खिडकी योजनेच्या काऊंटरवर अर्ज / आवेदनपत्र सादर केल्यानंतर विद्यार्थी/पालक/महाविद्यालयाचे अधिकारी/कर्मचारी / प्रतिनिधी यांच्या मोबाईलवर मेसेजद्वारे लिंक उपलब्ध होऊन त्यानी अर्ज/आवेदनपत्र सादर केल्यानंतर अर्जावर कार्यालय करत असलेल्या / केलेल्या कार्यवाहीबाबतचा तपशिल लिंकद्वारे उपलब्ध होतो. एक खिडकी योजना काऊंटरवर अर्ज सादर केल्यानंतर संबंधितांच्या अर्जावर/आवेदनपत्रावर विहित मुदतीत कार्यवाही न झाल्यास अथवा दिरंगाई झाल्यास विद्यापीठाच्या संकेतस्थळावर College student Grievance Redressal System ही पध्दत उपलब्ध आहे.

**परिपत्रक :**

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षांच्या निकालासंदर्भातील त्रुटी, विद्यार्थ्यांच्या प्रलंबित कामांच्या तक्रारी त्यांना विद्यापीठास सादर करण्यात याव्यात याकरिता विद्यापीठाच्या संकेतस्थळावर खालील प्रमाणे लिंकचा वापर करावा.

..२.

**विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे लिंकमधील स्टेप प्रमाणे वापर करावा**

http://online.bamu.ac.in/unic

↓

Select User

↓

Student

↓

College student Grievance Redressal System

↓

Open New Ticket

विद्यार्थ्यांनी वरील लिंकचा वापर केल्यानंतर त्यांना तक्रारीसंबंधीचे तिकीट नंबर उपलब्ध होईल, त्यानंतर तिकीट नंबरच्या आधारे विद्यार्थ्यांच्या तक्रारीचे निवारण करण्यात येईल. यासाठी विद्यार्थी आहे त्या ठिकाणावरुन सदरील लिंकचा वापर करु शकतील व त्यांना त्यांच्या तक्रारीविषयी विद्यापीठात यावे लागणार नाही.

तिकीट नंबर प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या तक्रारीवर कार्यवाही करण्यात येऊन लिंकवर विद्यार्थ्याच्या तक्रारीचे निराकरण करण्यात येईल.

करिता, वरील लिंकचा सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी वापर करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

या परिपत्रकाची माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित :

१. मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
२. मा. प्र-कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
३. मा. कुलसचिव महोदयांचे स्वीय सहाय्यक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
४. सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख, विद्यापीठ परिसर व उपपरिसर, उस्मानाबाद
५. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
६. संचालक, युनिक, बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
७. जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
८. उपकुलसचिव, परीक्षा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

प्रत :

१. सर्व कक्ष अधिकारी, परीक्षा विभाग
२. सर्व कर्मचारी, परीक्षा विभाग

Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Aurangabad-431004 Maharashtra (India)
NAAC Re-accredited A

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद-४३१००४. महाराष्ट्र(भारत)
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : coe@bamu.ac.in

Office : Director, Board of Examinations & Evaluation

कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२२/ 1483

दिनांक : ०२.०२.२०२२ 04

## कालमर्यादा

**प्रति,**
**प्राचार्य/संचालक,**
**सर्व संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद.**

**विषय : दिनांक ०८.०२.२०२२ पासुन सुरु होणाऱ्या ऑनलाईन परीक्षाबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी सर्व संबधितांना कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील आक्टोबर/नोव्हेंबर २०२१ च्या फेब्रुवारी/मार्च २०२२ मध्ये होणाऱ्या सर्व पदवी अभ्यासक्रमांच्या व्दितीय व तृतीय वर्षाच्या **(तृतीय, चतुर्थ, पाचवे व सहावे सत्र)** परीक्षा दिनांक ०८ फेब्रुवारी २०२२ पासून ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत.

सदर परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षा देतांना काही अडचण निर्माण होऊ नये व त्यांचा सराव व्हावा म्हणून **ऑनलाईन सराव व नियमित परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन परीक्षा कशी द्यावयाची याबाबत मार्गदर्शन सुचना व महत्वाचे मुद्दे देण्यात येत आहेत. तरी सोबत जोडलेले ऑनलाईन सराव (Mock Test) परीक्षेसाठीचे मुद्दे व सुचनाची कटाक्षाने नोंद घेऊन त्याप्रमाणे परीक्षा देण्याची कार्यवाही करावी.**

तरी सर्व संबधित विद्यार्थ्यांनी सदर मुद्दे व सुचनांप्रमाणे कार्यवाही करुन **दिनांक ०४.०२.२०२२ ते ०७.०२.२०२२ या दरम्यान ऑनलाईन सराव (Mock Test) परीक्षा द्यावी.**

सदर पत्र विद्यापीठाच्या http://bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Circular/Notice या सदराखाली प्रसिद्ध करण्यात आले आहे.

**सोबत : वरीलप्रमाणे**

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Examinations Aurangabad

**संचालक**
**परीक्षा व मुल्यामापन मंडळ**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## ऑनलाईन परीक्षा सुरक्षा प्रणाली (System Warning)

१. सर्व विद्यार्थ्यांचे फोटोज सॉफ्टवेअर मध्ये अपलोड केलेले आहेत, विद्यार्थ्यांने परीक्षा सुरु करतांना मोबाईलचा कॅमेरा फिचर ऑन ठेवावे सिस्टम आपला फोटो कॅच करुन पडताळून पाहिल व मॅच झाल्यास पुढे परीक्षा सुरु होईल फोटो मॅच न झाल्यास परीक्षा देता येईल मात्र त्याची पडताळणी केली जाईल.

२. विद्यार्थी चेहरा पडताळणी वा अन्य कारणांनी लॉग आउट झाल्यास एकुण दोन वेळा रि-लॉगीन करता येईल.

३. परीक्षा देतांना विद्यार्थ्यांव्यतिरिक्त इतर कोणीही जवळपास दिसला, कॅमेरात आला, कॅमेरा बाहेरुन उत्तरे दिली त्याचीही नोंद सिस्टमला होईल व हा गैरप्रकार गणला आऊन त्यास विद्यापीठ नियमानुसार चौकशी केली जाईल आणि सिध्द Unfair Means झाल्यास शिक्षा होऊ शकेल.

४. विद्यार्थ्यांने लॉगिन केल्यानंतर चेहरा पडताळणी झाल्यानंतर मोबाईल कॅमेरा आपल्या चेहऱ्यावर राहील याच पध्दतीने मोबाईल ऑपरेट करावा, कॅमेरा पासून चारही दिशांनी ०२ फुटाच्या आत इतर व्यक्ती, हालचाल आढळल्यास तो गैरप्रकार गणला जाऊन त्याची गैरप्रकाराची चौकशी केली जाईल व नियमानुसार शिक्षेस पात्र राहील.

५. उपरोक्त System Warning व्यतिरिक्त विद्यार्थ्यांची पुढील इतर कुठल्या कारणांनी बंद पडल्यास / लॉग आउट झाल्यास विद्यार्थ्यांने आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेने नियुक्त केलेल्या I.T. Coordinator यांना संपर्क साधावा. I.T. Coordinator यांच्या व्दारे कारणांची पडताळणी करुन पुढील योग्य ती कार्यवाही करतील. मात्र वारंवार विद्यार्थी स्वतःच लॉगआऊट होऊन परत लॉगिन होत असेल तर त्यास परीक्षा गैरप्रकार चौकशीत सामोरे जावे लागेल.

**कृपया विद्यार्थ्यांनी वरील सूचनांचे तंतोतंत पालन करावे व यात गैरप्रकार करुन नयेत/घडु नये याची दक्षता घ्यावी.**

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Examinations Aurangabad

**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad**

# Online Exam User Manual

## Checklist/Requirement:
## चेकलिस्ट / मूलभूत गरजा :

1. Android phone, Desktop, Laptop (Windows / Linux / Mac) with working front camera as webcam.
   ऐनड्रोइड फोन, डेस्कटॉप, लॅपटॉप (विंडोज/लिनक्स, मॅक) फ्रंट कॅमेरा सहित. फोन चा कॅमेरा वर्किंग कंडीशन मध्ये असणे आवश्यक आहे.
2. Make sure you are using updated browser such as **(Chrome or Mozilla Firefox)**
   गुगल क्रोम किंवा मोझीला फायर्फोक्स ब्राउझर वापरावा.
3. Must have an active internet connection
   इंटरनेट कनेक्शन सक्रिय असणे आवश्यक आहे
4. Keep stationery as required (pencil, pen, rough sheet)
   काही पेन्सिल, कागद इत्यादी वस्तू गरज असल्यास जवळ ठेवाव्यात.

# Candidate Instructions:
# उमेदवार सूचना:

1. Username is your 16 digit Permanent Registration Number (PRN).


   युझर नेम हा तुमचा 16 अंकी PRN आहे.

2. Password is your seat number given on current semester hallticket.

   पासवर्ड हा चालू सत्राच्या हॉलतिकीटवर दिलेला तुमचा सीट क्रमांक आहे

3. Click on Active Tests and select appropriate test from the drop-down list.
   Active Tests वर क्लिक करा व ड्रोप डाऊन मधून आपली टेस्ट निवडा.
4. Click on Sign In
   Sign In वर क्लिक करा.


## Sign In Page



## Webcam / Photo Capturing
## (वेबकॅम / फोटो पडताळणी)

1. The Webcam captures your face randomly for security purposes and verifies various aspects to ensure integrity of examinations.
   वेबकॅम द्वारा परीक्षा सुरु असतांना तुमचे वेळोवेळी फोटो काढले जातील, व आपण काही गैरप्रकार करीत नाही आहात न याची सतत पडताळणी होत राहील.
2. We will be monitoring the examination. Any malpractices found on your end will You will see various warnings before you disconnect.
   आम्ही आपल्या परीक्षेचे सतत पर्यवेक्षण करीत राहू. विद्यार्थ्यास वेळोवेळी सूचना/ ताकीद स्क्रीन वर दिली जाईल .
3. Please be alone in the room during the examination.
   परीक्षा देताना विद्यार्थी बसला असेल त्या खोलीत विद्यार्थी सोडून दुसरे कोणीही असता कामा नये.
4. Ensure there is no noise or talking in the room during the examination.
   परीक्षा सुरु असताना विद्यार्थ्याने कोणत्याही प्रकारे बोलणे, खुणा करणे इत्यादी करू नये.
5. During monitoring if more than one person is found in the nearby areas your examination will be put on hold and further action would be taken.
   परीक्षा देताना विद्यार्थ्याच्या आजूबाजूस कुणी दुसरी व्यक्ती आसता काम नये .


**Webcam / Photo Capturing**



# STEPS FOR SYSTEM FUNCTIONS

Examination page is displayed to user after successful login. Following sections explain different parts of examination page.
यशस्वी लॉगिन केल्यानंतर वापरकर्त्याला परीक्षा पृष्ठ प्रदर्शित केले जाते. पुढील विभाग परीक्षा पृष्ठाचे वेगवेगळे भाग स्पष्ट करतात.

1. **Candidate's Information**
   - Candidate's full name is displayed at top-left of the page.
   - उमेदवाराचे पूर्ण नाव पृष्ठाच्या शीर्षस्थानी डावीकडे प्रदर्शित केले जाते.
2. **Timer**
   - Your remaining exam time will be displayed at top-right of the page.
   - आपला परीक्षेत उरलेला वेळ आपल्याला स्क्रीन च्या वरील उजव्या कोपऱ्यात दिसत राहील
3. **Question Information**
   - Question number, marks for question, bookmark of question is displayed in this section which appears below the top row.
   - प्रश्न क्रमांक, प्रश्नाचे गुण, बुकमार्क, हे सर्वात वरच्या ओळीत दिसतील
4. **Question Description**
   - This section (light gray box) is the actual question displayed to user.
   - फिक्या राखाडी रंगात विद्यार्थ्यास प्रश्न दिसेल.
5. **Options पर्याय**
   - This section displays all options available for the question displayed above. Candidate should click on one of the options to mark their answer.
   - या भागात उत्तराचे सर्व पर्याय दिसतील. विद्यार्थ्याने क्लिक करून योग्य पर्याय निवडणे अपेक्षित आहे.



### 6. Navigation


- Bottom-center of exam page has four navigation links (First, Previous, Next, Last) to move across questions.
- परीक्षेच्या पेज वर सर्वात खाली मध्यभागी असलेल्या First, Previous, Next, Last या कीज वापरून विद्यार्थी कोणत्याही प्रश्नावर जाऊ शकेल.

### 7. Questions, Bookmark, Invalid

- Bottom-left of the page has three buttons. Clicking on "Questions" buttons shows list of questions (Explained later).
- पेजच्या सर्वात खालील भागात डावीकडे "Questions" बटण आहेत. "Questions" क्लिक केल्यावर विद्यार्थ्यास प्रश्नांची अनुक्रमणिका दिसेल.
- Clicking on "Bookmark" button adds a bookmark icon to the question in case user wants to revisit (go back to) the question later.
- "Bookmark" वर क्लिक केल्यावर स्क्रीनवरील प्रश्न बुकमार्क केला जाईल, ज्यायोगे विद्यार्थ्यास त्या प्रश्नावर परत जाणे सोयीस्कर होईल.
- Clicking on "Invalid" button adds Invalid icon to the question in case user believes the answers are incorrect.
- "अवैध" बटणावर क्लिक केल्याने प्रश्नावर अवैध चिन्ह जोडले जाते. जर वापरकर्त्याची खात्री असेल की उत्तरे चुकीची आहेत.

### 8. Clear and Submit Test

- Bottom-right of the page has two buttons. Clicking on "Clear" deselects option if candidate has selected one. Clicking on "Submit Test" button prompts candidate to confirm that candidate wants to submit/end test.
- पेजच्या सर्वात खालील भागात उजवीकडे "Clear" व "Submit test" ही बटणे आहेत. Clear वर क्लिक केल्यास विद्यार्थ्याने निवडलेला पर्याय रद्द होऊन त्यास दुसरा पर्याय निवडता येईल. Submit test वर क्लिक केल्यावर सिस्टीम विद्यार्थ्यास "तुम्हाला नक्की टेस्ट सबमिट करायची आहे न?" हे इंग्रजीत विचारेल, व विद्यार्थ्याने कन्फर्म केल्यावर त्याची टेस्ट सबमिट होईल.




Question, Bookmark, Invalid

NAVIGATION


Clear and Submit Button

**9. Select Option**

- Clicking on one of the radio buttons next to option selects and saves the option for the question displayed. If the option is saved successfully, a green notification bar confirming save is displayed at top of the page.
- पर्यायाच्या डावीकडील बटनावर क्लिक केल्यावर तो पर्याय निवडला जाईल. निवडलेला पर्याय सेव्ह झाल्याचे विद्यार्थ्यास पेज च्या सर्वात वरील भागात हिरव्या नोटीफीकेशन बार द्वारा सूचित केले जाईल

**10. Saved Message**

- A green notification bar confirming save is displayed at top of the page. In case of any error, a red bar appears. Candidate should immediately notify Technical Support Team in case of error.
- प्रश्न सेव्ह करताना काही एरर झाला तर विद्यार्थ्यास लाल रंगाचा नोटीफीकेशन बार मध्ये एरर दिसेल. असा काही एरर आल्यास विद्यार्थ्याने त्वरीत Technical Support Team बरोबर संपर्क साधावा
- Candidate should close his browser, post his query on the Support group to get solution for his query and login again.
- एरर आल्यास विद्यार्थ्याने ब्राउझर बंद करावा, आपली शंका/ अडचण सपोर्ट ग्रुप वर पोस्त करावी, व अडचण सोडवली गेल्यावर पुन्हा लॉगीन करावे.
- Candidates will be allowed for maximum re-login count of 5
- एका विद्यार्थ्यास जास्तीत जास्त ५ वेळा री-लॉगीन करता येईल.




## 11. Clear Option

- Clicking on “Clear” button deselects the option for the displayed question if the candidate has selected one. If no option was selected, this button does not have any effect.
- Clear बटण क्लिक केल्यास विद्यार्थ्याने निवडलेला पर्याय रद्द होऊन त्याला पुन्हा पर्याय निवडणे शक्य होईल.

## 12. Clear Message

- A light-yellow bar confirming clear appears on top of the page if the option was cleared for the question successfully.
- विद्यार्थ्याचा पर्याय रद्द झाल्याचे त्याला पिवळ्या रंगाच्या नोटीफीकेशन बार द्वारा सूचित केले जाईल.




## 13. Questions Button

- Clicking on “Questions” button display’s candidates’ responses to each question.
- “Questions” बटण क्लिक केल्यावर विद्यार्थ्याने प्रत्येक प्रश्नास निवडलेले पर्याय दिसतील.

## 14. List of Questions

- This section/table shows all questions along with option selected by the candidate for each question. It also shows bookmarks if any. Question numbers are clickable and will take the candidate directly to the clicked question.
- या कोष्टकात विद्यार्थ्यास सारे प्रश्न व त्यांच्या उत्तराचे विद्यार्थ्याने निवडलेले पर्याय दिसतील. काही प्रश्न बुकमार्क केलेले असतील तर तेही दिसतील. प्रश्न क्रमांकावर क्लिक केल्यास विद्यार्थ्यास त्या प्रश्नावर जाता येईल.




**15. Bookmark Button**

- Clicking on "Bookmark" button marks the displayed question with the bookmark icon. Bookmarks are useful if the candidate wants to revisit (go back to) a question later.
- "Bookmark" बटणावर क्लिक केल्यास बुकमार्क केलेले सारे प्रश्न दिसतील. विद्यार्थ्यास काही प्रश्नाची उत्तरे विचार करून नंतर द्यावेसे वाटल्यास बुकमार्क बटणाचा उपयोग करता येतो.

**16. Bookmark Icon**

- Bookmark icon is displayed in the question information section of the page alongside question number and marks.
- Question information section मध्ये बुकमार्क केलेल्या प्रश्नाच्यागून, प्रश्न क्रमांक, यांच्याबरोबर बुकमार्क आयकॉन दिसेल.




### 17. Invalid Button

- Clicking on the “Invalid” button marks the displayed question with Invalid icon. Invalid is useful if the candidate believes the answers are incorrect.
- “Invalid” बटणावर क्लिक केल्याने प्रदर्शित चिन्हास अवैध चिन्हासह चिन्हांकित केले जाते. उमेदवाराची उत्तरे चुकीची असल्याचा विश्वास असल्यास अवैध उपयुक्त आहे.


### 18. Invalid Icon

- Invalid icon is displayed in the question information section of the page alongside question number and marks.
- Question पृष्ठाच्या प्रश्न माहिती विभागात प्रश्न चिन्ह आणि गुणांसह अवैध चिन्ह प्रदर्शित केले जाईल.




## 19. Submit Button

- Candidate may click on the "Submit Test" button if he/she wants to submit/end the test before the timer expires. If time expires, the exam will be submitted automatically candidate exam is submitted automatically.
- परीक्षेचा पेपर वेळेआधीच सबमिट करावयाचा असल्यास विद्यार्थ्याने सबमिट बटण दाबावे. वेळ संपल्यावर परीक्षेचा पेपर आपोआप सबमिट होईल.




## 20. Submit Confirmation Message

- A confirmation message is displayed before submitting the test. Candidate should choose carefully. **Tests once submitted cannot be re-opened.**
- विद्यार्थ्याने सबमिट बटण दाबल्यास त्याला वरीलप्रमाणे कन्फर्मेशन मेसेज दिसेल. त्याने कन्फर्म केल्यावरच परीक्षा सबमिट होईल. **एकदा सबमिट झालेला पेपर पुन्हा विद्यार्थ्यास देता येणार नाही.**



Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Aurangabad-431004 Maharashtra (India)
NAAC Re-accredited A

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद-४३१००४. महाराष्ट्र(भारत)
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : coe@bamu.ac.in

Office : Director, Board of Examinations & Evaluation

कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा/२०२२/2264 दिनांक : १३.०९.२०२२

**प्रति,**
**विभाग प्रमुख/संचालक/प्राचार्य,**
**सर्व शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद.**

विषय : राखीव निकाल घोषित करणे व ऑनलाईन प्रवेशाबाबत.
संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र. प.व.मू./समन्वय/२०२२/२२४०, दि. ०६.०८.२०२२

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, मार्च/एप्रिल-२०२२ च्या जुन/जुलै २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार ज्या अभ्यासक्रमाचा निकाल घोषित करण्यात आलेला आहेत अशा अभ्यासक्रमाच्या आपल्या विभाग/महाविद्यालय/परिसंस्थेतील किती विद्यार्थ्यांचे निकाल विद्यापीठामार्फत राखीव (RR, EHB & Porting Cases) ठेवण्यात आलेले आहेत त्यांची माहिती सादर करण्याकरिता संदर्भिय परिपत्रक अन्वये विद्यापीठामार्फत केलेल्या आवाहनास सर्व महाविद्यालय/परिसंस्थानी सकारात्मक प्रतिसाद दिल्यामुळे आपले आभारी आहोत.

परंतु अनेक महाविद्यालय/परिसंस्थामार्फत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे राखीव निकाल घोषित करणे व ऑनलाईन प्रवेशाबाबत अडचणी निर्माण होत आहे. त्याबाबत महाविद्यालय/परिसंस्थांकडुन दुरध्वनीव्दारे विद्यापीठास वारंवार संपर्क करण्यात येत आहे.

करिता, सर्व शैक्षणिक विभागाचे विभाग प्रमुख व सर्व संलग्नित महाविद्यालय/परिसंस्थेतील प्राचार्य/संचालक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना कळविण्यात येत की, निकाल किंवा प्रवेशा संबधी कोणत्याही प्रकारची अडचण असल्यास विद्यापीठातील कोणत्याही दुरध्वनीवर संपर्क न करता आपल्या अडचणींची माहिती व यादी coe@bamu.ac.in या ई-मेल आयडीवर पाठवावी. त्यानंतर ही आपल्या अडचणी सोडविल्या न गेल्यास आपण संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांना 0240-2403201 या क्रमांकावर संपर्क करावा. हि विनंती.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad Examinations

**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**